विस्तार अधिकारी (कृषी) संवर्गातील
कर्मचा-यांच्या सर्वसाधारण बदल्या व
नेमणूका करणेबाबत –
**विनंती बदली २०२५**

जिल्हा परिषद अहिल्यानगर
कृषि विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. कृषि/आस्था-२/२२५/२०२५
अहिल्यानगर दि.१८/०५/२०२५

वाचा - १. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.जिपब-४१४/प्र.क्र.-११२/आस्था- १४ दि. १५/०५/२०१४.
२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडिल शासन शुध्दीपत्रक क्रं.जिपब-४१४/प्र.क्रं.११२/ आस्था-१४, दि. ०२/०७/२०१४
३. ग्रामविकास विभागाकडील शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१६/प्र.क्र.१३६/आस्था-१४ दि.०२/०१/२०१७
४. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.जिपब-८१७/प्र.क्र.२२८/आस्था- १४ दि. ०७/०३/२०१९.
५. सर्वसाधारण बदल्यांचे इतिवृत्त दि. १३/०५/२०२५

शासनाकडील संदर्भ क्रमांक १ च्या निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार, शुध्दीपत्रक व तद्अनुषंगिक निर्णयातील तरतुदींनुसार, जिल्हा परिषदेअंतर्गत कृषि विभागाच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या विस्तार अधिकारी (कृषी) या संवर्गातील कर्मचा-यांच्या समुपदेशनाने त्यांच्या नावापुढील रकाना क्रमांक ३ येथे नमुद कार्यालयातून रकाना क्रमांक ४ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी **विनंती** बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव व पदनाम | सध्याचे कार्यरत ठिकाण | विनंती बदलीने दिलेले ठिकाण | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीम स्वाती वसंतराव थिगळे, विस्तार अधिकारी (कृषी) | पंचायत समिती नेवासा | पंचायत समिती राहुरी | विनंती |

वरील कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी हजर होणेकामी दि. ३१/०५/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ मधील प्रकरण-१ मुद्दा क्र. ७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन दि. ०१/०६/२०२५ नंतर वेतन व भत्ते अदा करु नयेत. तसेच मुद्दा क्र. ८ मध्ये नमुद केलेनुसार बदली ही संपुर्ण प्रशासकीय बाब असल्याने कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ६ (५) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. सदर बदल्या विनंतीवरुन झालेल्या असल्याने संबंधीतांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय असणार नाही.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202505160900१३ असा आहे.

(आशिष येरेकर, भाप्रसे )
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

प्रति,
श्रीम स्वाती वसंतराव थिगळे , विस्तार अधिकारी (कृषी)
द्वारा गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा

प्रत – गट विकास अधिकारी पंचायत समिती नेवासा
२/- उपरोक्त बदली झालेल्या कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधीताचे वेतन दि. ०१/०६/२०२५ नंतर अदा करु नये, तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
प्रत - गट विकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी
प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रतः- निवड नस्ती

(आशिष येरेकर, भाप्रसे )
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

CamScanner